Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

C

Paper-II
EDUCATION

Signature and Name of Invigilator

1. (Signature) .....

(Name) .....

2. (Signature) .....

(Name) .....

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. .....

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

SEP- 70221

Time Allowed : 2 Hours] **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **36** Number of Questions in this Booklet : **100**

Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   Example : where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   उदा. : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

Education
Paper II
शिक्षाशास्त्र
प्रश्नपत्रिका II

Time Allowed : 120 Minutes] **[Maximum Marks : 200**

Note : This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. '.....' is the foundation for any curriculum framework.

   (A) Curriculum objectives

   (B) Curriculum content

   (C) Curriculum transaction

   (D) Curriculum evaluation

2. Which of the following criteria of good objectives of curriculum is *not* correct ?

   (A) They should agree with broader goals of education

   (B) They should be testable in terms of observable and verifiable changes

   (C) They should be worthwhile and of educational significance

   (D) They should be convenient to teachers' work schedule

1. कोणत्याही अभ्यासक्रम आराखड्याचे अधिष्ठान '.....' हे असते.

   (A) अभ्यासक्रम उद्दिष्टे

   (B) अभ्यासक्रम आशय

   (C) अभ्यासक्रम कार्यवाही

   (D) अभ्यासक्रम मूल्यमापन

2. अभ्यासक्रमाच्या चांगल्या उद्दिष्टांच्या निकषांपैकी खालील निकषांमध्ये कोणता निकष योग्य **नाही** ?

   (A) ही उद्दिष्टे शिक्षणाच्या व्यापक उद्दिष्टांशी मेळ घालणारी असावीत

   (B) निरीक्षणक्षम आणि पडताळाक्षम अशा रीतीने ही उद्दिष्टे तपासता यावीत

   (C) ही उद्दिष्टे उपयुक्त व योग्य असावीत तसेच त्यांना शैक्षणिक महत्त्व असावे

   (D) ही उद्दिष्टे शिक्षकांच्या कामकाजाच्या वेळापत्रकाशी सोयीस्कर असावीत

3. ..... implies that there are certain kinds of learning which are not included in the curriculum and time table but got transmitted by institutional arrangement.

(A) Core curriculum

(B) Spiral curriculum

(C) Hidden curriculum

(D) Optional curriculum

4. ..... regards learning primarily as cognitive development and the acquisition of knowledge and information.

(A) Subject-centered curriculum

(B) Student-centered curriculum

(C) Activity-centered curriculum

(D) Experience-centered curriculum

5. Those who are concerned with developing educational curriculum are all guided by the criterion '.....'.

(A) What knowledge is most available ?

(B) What knowledge is most worth ?

(C) What knowledge is most popular ?

(D) What knowledge is most easier ?

3. जे अध्ययन अभ्यासक्रमात आणि वेळापत्रकात समाविष्ट नसते मात्र संस्थेने केलेल्या विशेष व्यवस्थेतून घडून येते. असे अध्ययन ..... मधून सूचित होते.

(A) गाभा अभ्यासक्रम

(B) सर्पिल अभ्यासक्रम

(C) सुप्त अभ्यासक्रम

(D) वैकल्पिक अभ्यासक्रम

4. ..... मध्ये अध्ययन हे प्रामुख्याने बोधात्मक विकास आणि ज्ञान व माहितीचे संकलन मानले जाते.

(A) विषयकेंद्रित अभ्यासक्रम

(B) विद्यार्थीकेंद्रित अभ्यासक्रम

(C) कृतिकेंद्रित अभ्यासक्रम

(D) अनुभवकेंद्रित अभ्यासक्रस

5. शैक्षणिक अभ्यासक्रम विकसनाशी संबंधित असलेल्या व्यक्तींसाठी '.....' हे मार्गदर्शक निकष असतो.

(A) कोणते ज्ञान सर्वाधिक उपलब्ध आहे ?

(B) कोणते ज्ञान सर्वाधिक योग्य आहे ?

(C) कोणते ज्ञान सर्वाधिक लोकप्रिय आहे ?

(D) कोणते ज्ञान सर्वाधिक सोपे आहे ?

6. The approach of traditional teachers regarding curriculum is ..... .

(A) Subject matter minded

(B) Objective minded

(C) Methodology minded

(D) Evaluational minded

7. If some children do not learn well in prescribed curriculum, ...

(A) Means that the curriculum is difficult

(B) Implies that curriculum is not planned properly

(C) Does not necessarily imply an inherent weakness in the curriculum planning

(D) Indicates that the curriculum should be revised completely

8. A school curriculum has to be responsive to .....

(A) Convenience of teachers' work schedule

(B) Demands of subject teacher associations

(C) The needs and aspirations of changing society

(D) The suggestions of textbook bureau

6. अभ्यासक्रमाबाबत पारंपरिक शिक्षकांचा दृष्टिकोन ..... असतो.

(A) आशयनिष्ठ

(B) उद्दिष्टनिष्ठ

(C) कार्यपद्धतीनिष्ठ

(D) मूल्यमापननिष्ठ

7. एखाद्या अभ्यासक्रमाबाबतीत जर काही विद्यार्थी चांगले शिकत नसतील तर ..... .

(A) तो अभ्यासक्रम अवघड आहे असा अर्थ होतो

(B) त्या अभ्यासक्रमाचे नियोजन नीट झाले नाही, असे ध्वनित होते

(C) त्या अभ्यासक्रमातच काही दोष आहे असा अर्थ होत नाही

(D) तो अभ्यासक्रम पूर्णत: पुनर्रचित करण्यात यावा हे सूचित होते

8. शालेय अभ्यासक्रम हा ..... ला प्रतिसाद देणारा असला पाहिजे.

(A) शिक्षकांच्या कामकाजाच्या वेळापत्रकाच्या सोयी

(B) विषय शिक्षक संघटनांच्या मागण्या

(C) बदलत्या समाजाच्या गरजा आणि आकांक्षा

(D) पाठ्यपुस्तक मंडळाच्या सूचना

9. The model of curriculum evaluation developed by Robert Stake emphasizes on .....

(A) Cost-effectiveness analysis

(B) Content analysis

(C) Behaviour analysis

(D) Policy analysis

10. Which of the following is a *correct* statement ?

(A) Curriculum is the part of syllabus

(B) Syllabus is the part of curriculum

(C) Syllabus is a preparatory stage of curriculum planning

(D) Curriculum is syllabus added with teaching methodology

11. Inductive process in research involves moving from .....

(A) Known to unknown

(B) Unknown to known

(C) General assumptions to specific applications

(D) Specific observations to the generalization

9. रॉबर्ट स्टेक यांनी विकसित केलेले अभ्यासक्रम मूल्यमापन प्रतिमान ..... वर भर देते.

(A) व्यय-परिणामकारकता विश्लेषण

(B) आशय विश्लेषण

(C) वर्तन विश्लेषण

(D) धोरण विश्लेषण

10. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(A) अभ्यासक्रम हा पाठ्यक्रमाचा भाग असतो

(B) पाठ्यक्रम हा अभ्यासक्रमाचा भाग असतो

(C) पाठ्यक्रम हा अभ्यासक्रम विकसनाची पूर्वतयारीची अवस्था असते

(D) अभ्यासक्रम म्हणजे पाठ्यक्रमात अध्यापन पद्धतींचा समावेश करणे होय

11. संशोधनामधील उद्‌गामी प्रक्रिया ही ..... अशी होते.

(A) ज्ञाताकडून अज्ञाताकडे

(B) अज्ञाताकडून ज्ञाताकडे

(C) सामान्य गृहीतकांकडून विशिष्ट उपयोजनाकडे

(D) विशिष्ट निरीक्षणांकडून सामान्यीकरणाकडे

12. Multistage sampling is used in large scale surveys because .....

(*i*) It is convenient

(*ii*) It is less time consuming

(*iii*) We may overcome the problem of non-response here

(*iv*) It is a type of random sample

(A) (*i*) and (*ii*)

(B) (*ii*) and (*iii*)

(C) (*i*) and (*iii*)

(D) (*i*), (*ii*), (*iii*) and (*iv*)

13. To compare the variance of two independent sample, ... is used.

(A) *z*-test

(B) *t*-test

(C) ANOVA

(D) ANCOVA

14. A study conducted on an exceptional institution falls under .....

(A) Historical research

(B) Action research

(C) Fundamental research

(D) Case-study research

12. मोठ्या प्रमाणावरील सर्वेक्षणामध्ये बहुस्तरीय नमुनानिवडीचा उपयोग केला जातो कारण .....

(*i*) ते सुलभ असते

(*ii*) त्यासाठी कमी वेळ लागतो

(*iii*) यामध्ये आपण प्रतिसाद न देण्याच्या समस्येवर मात करू शकतो

(*iv*) तो यादृच्छिक नमुन्याचा एक प्रकार आहे

(A) (*i*) आणि (*ii*)

(B) (*ii*) आणि (*iii*)

(C) (*i*) आणि (*iii*)

(D) (*i*), (*ii*), (*iii*) आणि (*iv*)

13. दोन स्वतंत्र नमुन्यांतील प्रसरणाची तुलना करण्यासाठी ..... वापरतात.

(A) *z*-कसोटी

(B) *t*-कसोटी

(C) ANOVA

(D) ANCOVA

14. अपवादात्मक संस्थेच्या केलेल्या संशोधनात्मक अभ्यासाचा समावेश ..... संशोधनामध्ये होतो.

(A) ऐतिहासिक

(B) कृती

(C) मूलभूत

(D) व्यक्ती–अभ्यास

15. A preferred sampling method for the population with finite size is .....

(A) Systematic sampling

(B) Purposive sampling

(C) Area sampling

(D) Cluster sampling

16. The scale that has properties of order and distance and used to judge the difference between two objects is .....

(A) Nominal scale

(B) Ordinal scale

(C) Interval scale

(D) Ratio scale

17. The research process that uses inductive, interactive and repetitious collection of unstructured data and analytic strategies is .....

(A) Grounded theory

(B) Narrative

(C) Ethnography

(D) Phenomenology

15. मर्यादित आकाराच्या जनसंख्येसाठी ..... नमुनानिवड पद्धतीला प्राधान्य दिले जाते.

(A) नियमबद्ध

(B) सहेतुक

(C) क्षेत्र

(D) गुच्छ

16. ज्या श्रेणीमध्ये क्रम आणि अंतराची वैशिष्ट्ये असतात आणि जिचा उपयोग दोन घटकातील फरक ठरविण्यासाठी केला जातो. अशा श्रेणीला ..... असे म्हणतात.

(A) नामांकन

(B) क्रमांकन

(C) अंतर

(D) गुणोत्तर

17. ज्या संशोधनप्रक्रियेमध्ये असंघटित माहितीचे उदगामी आंतरक्रियात्मक आणि पुनरावर्ती (repetitious) संकलन केले जाते आणि विश्लेषणात्मक कार्यनीती वापरल्या जातात, त्यास ..... असे म्हणतात.

(A) प्रवृत्ती सिद्धांत (Grounded theory)

(B) कथन

(C) नृवंशशास्त्र (Ethnography)

(D) मानसघटनाशास्त्र (Phenomenology)

18. A research conducted for a problem that has not been studied more clearly, intended to establish priorities, develop operational definitions and improve the final research design is .....

(A) Explanatory research

(B) Ethnographical research

(C) Exploratory research

(D) Experimental research

19. A type of qualitative narrative research design is .....

(A) Ontology

(B) Biography

(C) Epistemology

(D) Ideology

20. Delimitations of the study is to be written by the researcher at the .....

(A) time of writing the research report

(B) time of data collection

(C) during the conduct of research

(D) proposal stage

18. एखाद्या समस्येच्या अभ्यास न केलेल्या, प्राधान्यक्रम ठरविण्याच्या हेतूने कार्यात्मक व्याख्या विकसित करण्यासाठी आणि अंतिम संशोधन अभिकल्पात सुधारणा करण्यासाठी केलेल्या संशोधनास ..... असे म्हणतात.

(A) स्पष्टीकरणात्मक संशोधन

(B) नृवंशशास्त्रीय संशोधन (Ethnographical Research)

(C) अन्वेषण संशोधन

(D) प्रायोगिक संशोधन

19. ..... हा गुणात्मक वर्णनात्मक संशोधन अभिकल्प आहे.

(A) तत्त्वमीमांसा (Ontology)

(B) चरित्र (Biography)

(C) ज्ञानमीमांसा (Epistemology)

(D) विचारधारा (Ideology)

20. संशोधकाने संशोधनाच्या परिमर्यादा ..... करताना लिहिल्या पाहिजेत.

(A) संशोधन अहवालाचे लेखन

(B) माहितीचे संकलन

(C) संशोधनाची कार्यवाही

(D) संशोधन आराखडालेखन

21. A ..... can also provide a basis for self-evaluation, reflection and peer review.

(A) Diary

(B) Scoring rubrics

(C) Questionnaire

(D) Reflective journal

22. The aim of scoring rubric is .....

(A) to assist learning

(B) to assist teaching

(C) to identify students' interests

(D) accurate and fair assessment

23. The art and science of educating children is .....

(A) Pedagogy

(B) Andragogy

(C) Hutagogy

(D) Anthropology

24. A teacher wants to assess his students' oral presentation skills and remarks about their individual strengths and weaknesses. The teacher should .....

(A) Rate each presentation holistically using numerical scale

(B) Assess each presentation using check list of relevant criteria

(C) Rank-order the presentation from most to least effective

(D) Make students to write critiques of their own presentations

21. स्वयं-मूल्यमापन, चिंतन (reflection) आणि सहाध्यायी आढावा यांच्यासाठी पाया म्हणून ..... सुद्धा माहिती पुरवते.

(A) रोजनिशी

(B) स्कोअरींग रूब्रीक्स

(C) प्रश्नावली

(D) रिफ्लेक्टीव्ह जर्नल

22. प्राप्तांक देण्यासाठीच्या रूब्रिकचे ध्येय ..... हे असते.

(A) अध्ययनास मदत करणे

(B) अध्यापनास मदत करणे

(C) विद्यार्थ्यांची अभिरुची शोधणे

(D) अचूक आणि सुस्पष्ट मूल्यांकन करणे

23. मुलांना शिक्षित करण्याची कला आणि शास्त्र म्हणजे ..... होय.

(A) अध्यापनशास्त्र

(B) प्रौढ अध्यापनशास्त्र

(C) स्वयंनिर्धारित अध्ययनशास्त्र

(D) मानववंशशास्त्र

24. एका शिक्षकाला त्याच्या विद्यार्थ्यांची मौखिक सादरीकरण कौशल्यांचे मूल्यांकन करून त्यांच्या व्यक्तिगत बलस्थाने व कमकुवत बाबींबद्दल शेरा द्यावयाचा असेल तर त्याने .....

(A) संख्यात्मक श्रेणीचा वापर करून प्रत्येक सादरीकरणाची सर्वसमावेशात्मक श्रेणी द्यावी

(B) संबंधित निकषाधारित पडताळासूचीचा वापर करून प्रत्येक सादरीकरणाचे मूल्यांकन करावे

(C) सादरीकरणांची सर्वात जास्त परिणामकारकते कमीत कमी परिणामकारक अशी क्रमबद्ध श्रेणी द्यावी

(D) विद्यार्थ्यांनी त्यांच्या सादरीकरणाची चिकित्सा लिहावयास सांगावे

25. Which of the following is *not* teacher prepared ICT resource ?

(A) Educational video clips

(B) PowerPoint presentation

(C) Blogs for educational purpose

(D) Classroom interactions

26. In revised Bloom's Taxonomy by Anderson and Krathwohl ..... level of knowledge was newly added.

(A) Factual

(B) Conceptual

(C) Procedural

(D) Metacognitive

27. In revised Bloom's Taxonomy, various levels of cognitive domain has been defined in the form of .....

(A) Nouns

(B) Adjectives

(C) Verbs

(D) Adverbs

25. खालीलपैकी कोणता शिक्षकनिर्मित स्रोत माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाशी निगडित **नाही** ?

(A) शैक्षणिक व्हिडीओ क्लिप्स

(B) पावरपॉईंट प्रेझेंटेशन्स

(C) शैक्षणिक वापरासाठीचे ब्लॉग्ज

(D) वर्गातील आंतरक्रिया

26. अँडरसन व क्रॅथवोल यांनी सुधारित केलेल्या ब्लूम यांच्या श्रेणीबद्ध वर्गीकरणामध्ये ज्ञानाच्या ..... पातळीचा नव्याने अंतर्भाव केला आहे.

(A) तथ्यात्मक

(B) संबोधात्मक

(C) प्रक्रियात्मक

(D) पराबोधात्मक (Metacognitive)

27. ब्लूम यांच्या सुधारित श्रेणीबद्ध वर्गीकरणामध्ये बोधात्मक क्षेत्रातील विविध पातळ्या ..... स्वरूपात मांडल्या आहेत.

(A) नामांच्या

(B) विशेषणाच्या

(C) क्रियापदाच्या

(D) क्रियाविशेषणांच्या

28. The focus of Morrison teaching model is .....

(A) Emphasis on cramming facts and principles by students and their proper retention

(B) Recalling and representing learnt facts

(C) Developing creative and critical thinking of students

(D) Getting complete mastery over the content or subject matter

29. Performing a skill or a task without assistance is an example of ..... level of psychomotor domain.

(A) Manipulation

(B) Imitation

(C) Articulation

(D) Precision

30. Rubrics usually contain .....

(A) Learning criteria

(B) Evaluative criteria

(C) Teaching criteria

(D) Interaction criteria

28. मॉरिसन अध्यापन प्रतिमानाचा लक्ष्यबिंदू ..... हा आहे.

(A) विद्यार्थ्यांनी तथ्ये व तत्त्वे यांची घोकंपट्टी करून ती लक्षात ठेवण्यावर भर देणे

(B) अध्ययन केलेल्या तथ्यांचे प्रत्यावाहन व सादरीकरण

(C) विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील व चिकित्सक विचारप्रक्रिया विकसित करणे

(D) आशय किंवा विषयवस्तूवर पूर्ण प्रभुत्व मिळवणे

29. एखादे कौशल्य अगर कार्य (task) कोणाच्याही मदतीशिवाय पार पाडणे हे क्रियाकौशल्यात्मक क्षेत्राच्या ..... पातळीचे उदाहरण आहे.

(A) हाताळणी

(B) अनुकरण

(C) संधीकरण

(D) अचूकता

30. रूब्रिकमध्ये बहुधा ..... चा समावेश असतो.

(A) अध्ययन निकष

(B) मूल्यमापन निकष

(C) अध्यापन निकष

(D) आंतरक्रिया निकष

31. As a behaviouristic psychologist, Skinner do not take cognizance of ..... with learning process.

(A) Motivation and understanding

(B) Forgetting and understanding

(C) Insight and understanding

(D) Learning ability and understanding

32. According to assumptions of behavioural technology, teacher's behaviour is *not* .....

(A) Observable

(B) Measurable

(C) Impartial

(D) Improvable

33. Programme learning is based on the principle of ..... learning theory.

(A) Operant Conditioning

(B) Conditioning

(C) Gestalt

(D) Cognitive

31. वर्तनवादी मानसशास्त्रज्ञ म्हणून स्किनर अध्ययनप्रक्रियेमध्ये ..... ची दखल घेत नाही.

(A) प्रेरणा व आकलन

(B) विस्मरण व आकलन

(C) मर्मदृष्टी व आकलन

(D) अध्ययनक्षमता व आकलन

32. वर्तनवादी तंत्रज्ञानाच्या गृहीतकांनुसार, ... हे शिक्षक वर्तन नसते.

(A) निरीक्षणक्षम

(B) मापनक्षम

(C) निरपेक्ष

(D) सुधारणायोग्य

33. अभिक्रमित अध्ययन हे ..... अध्ययन उपपत्तीच्या तत्त्वांवर आधारलेले आहे.

(A) साधक अभिसंधान

(B) अभिसंधान

(C) समष्टिवादी

(D) बोधात्मक

34. In synchronous communication participant students are allowing for .....

(A) Quicker problem solving

(B) Slower problem solving

(C) Time for reflection

(D) Often lacks spontaneity

35. In the ADDIE instructional design, ... is considered as the "Goal setting stage".

(A) Design

(B) Development

(C) Analysis

(D) Implementation

36. The 5 E's is an instructional model based on the constructivist approach to learning. In this model an 'engage' activity makes connections between ..... learning experiences.

(A) Past and Future

(B) Past and Present

(C) Present and Future

(D) Past, Present and Future

34. काल समन्वयित (Synchronous) संप्रेषणात सहभागी विद्यार्थ्यांना ..... साठी परवानगी असते.

(A) जलद समस्या निराकरणा

(B) सावकाश समस्या निराकरणा

(C) चिंतनाच्या वेळे

(D) बहुधा उत्स्फुर्ततेच्या अभावा

35. ADDIE या अनुदेशन संरचनेमध्ये, ... हे 'ध्येय निश्चिती स्तर' मानले जाते.

(A) संरचना

(B) विकास

(C) विश्लेषण

(D) कार्यान्वयन

36. 5 E हे अनुदेशनात्मक प्रतिमान अध्ययनाच्या ज्ञानरचनावादी दृष्टिकोनावर आधारलेले आहे. या प्रतिमानातील 'गुंतवणूक' कृतीत ..... अध्ययन अनुभूतींचा संबंध जोडला जातो.

(A) भूतकाळ व भविष्यकाळ

(B) भूतकाळ व वर्तमानकाळ

(C) वर्तमानकाळ व भविष्यकाळ

(D) भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ

37. In system approach to instructional design mainly ..... component is considered for discovering objectives.

(A) Analysis of content

(B) Analysis of student needs

(C) Analysis of teaching needs

(D) Analysis of teaching aids

38. The assistant technology cannot help ..... students in classroom.

(A) Physical impairments

(B) Dyslexia

(C) Cognitive problems

(D) Antisocial

39. Educational online surveys for schools, teachers and students ..... website is frequently used in India.

(A) quara

(B) surveymonkey

(C) esurv

(D) panalplace

37. अनुदेशनासाठी प्रणाली उपागमामध्ये प्रामुख्याने ..... या घटकाचा उद्दिष्टांचा शोध घेण्यासाठी विचार केला जातो.

(A) आशयाचे विश्लेषण

(B) विद्यार्थ्यांच्या गरजांचे विश्लेषण

(C) अध्यापन गरजांचे विश्लेषण

(D) अध्यापन साधनांचे विश्लेषण

38. सहाय्यित तंत्रज्ञान वर्गातील ..... विद्यार्थ्यांना मदत करत नाही.

(A) शारीरिक अपंगत्व असणाऱ्या

(B) डिस्लेक्सिया

(C) बोधात्मक समस्या असणाऱ्या

(D) सामाजिक उपद्रवी

39. भारतातील शाळा, शिक्षक व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ऑनलाइन सर्व्हेक्षण करण्यासाठी वारंवार ..... ह्या संकेतस्थळाचा वापर होतो.

(A) quara

(B) surveymonkey

(C) esurv

(D) panalplace

40. ..... is a limitation of plagiarism software in research.

(A) Types of research

(B) Language of research report

(C) Level of research

(D) Nature of research

41. ..... is the basic function of Educational Management.

(A) Execution

(B) Co-ordination

(C) Direction

(D) Leadership

42. PERT (Project Evaluation and Review Technique) is used in Educational Administration for Management of ..... .

(A) Unpredictable activities

(B) Predictable activities

(C) Predictable and unpredictable activities

(D) Predesigned activities

43. 'Management provides effective training to the teachers' is an example of .....

(A) Organizational change

(B) Organizational management

(C) Organizational climate

(D) Organizational compliance

40. संशोधनात साहित्य चोरी (Plagiarism) सॉफ्टवेअरच्या वापरात ..... ही मर्यादा आहे.

(A) संशोधन प्रकार

(B) संशोधन अहवाल भाषा

(C) संशोधन स्तर

(D) संशोधन स्वरूप

41. खालीलपैकी ..... हे शैक्षणिक व्यवस्थापनाचे मूलभूत कार्य आहे.

(A) अंमलबजावणी

(B) समन्वय

(C) दिशादर्शन

(D) नेतृत्व

42. PERT (Project Evaluation and Review Technique) हे शैक्षणिक प्रशासनातील ..... च्या व्यवस्थापनासाठी वापरले जाते.

(A) अननुमानित कृती

(B) अनुमानित कृती

(C) अनुमानित-अननुमानित कृती

(D) पूर्वसंरचित कृती

43. 'व्यवस्थापन हे शिक्षकांना परिणामकारक प्रशिक्षण पुरविते' हे ..... चे उदाहरण आहे.

(A) संघटनात्मक बदल

(B) संघटनात्मक व्यवस्थापन

(C) संघटनात्मक वातावरण

(D) संघटनात्मक अनुपालन

44. The 'Contingency Model' of Fred Fidler is concerned with .....

(A) Effectiveness of a leader

(B) Considerateness of a leader

(C) Relationship orientedness of a leader

(D) Mission and vision of the organization

45. Tri-dimensional model of B. Reddin deals with .....

(A) Connections with community

(B) Authentic leadership

(C) The concept of 'situational demands' for behaviour of a leader to be effective

(D) Team leadership

46. The father of statistical quality control is .....

(A) Fiedler

(B) C.K. Pralhad

(C) Walter A. Shewart

(D) Edward Deming

44. फ्रेड फिडलरचे 'आकस्मिकता प्रतिमान' हे ..... याच्याशी संबंधित आहे.

(A) नेत्याची परिणामकारकता

(B) नेत्याची विचारशीलता

(C) संबंधातील उन्मुखता

(D) संघटनेची ध्येयदृष्टी आणि कार्यव्रत

45. बी. रेडिन यांचे त्रिमितीय प्रतिमान हे ..... याच्याशी संबंधित आहे.

(A) समाजाशी नाते

(B) अधिकृत नेतृत्व

(C) नेत्याच्या वर्तनाच्या परिणामकारकतेसाठी 'परिस्थितीजन्य मागणी' ही संकल्पना

(D) सांघिक नेतृत्व

46. संख्याशास्त्रीय गुणवत्ता नियंत्रणाचा जनक ..... हे आहे.

(A) फिडलर

(B) सी.के. प्रल्हाद

(C) वॉल्टर ए. शेव्हर्ट

(D) एडवर्ड डेमिंग

47. In total quality management approach, ... based decision-making is included as a principle.

(A) Customer

(B) Employee

(C) Fact

(D) Service

48. In 'Just-in-Time' model the vendor is to be viewed by the company as a .....

(A) Manager

(B) Worker

(C) Partner

(D) Customer

49. Companies pay ..... as a part of quality control process to meet customer expectations.

(A) Prevention cost

(B) Inventory cost

(C) Opportunity cost

(D) Appraisal cost

47. समग्र गुणवत्ता व्यवस्थापन दृष्टिकोनात ..... आधारित निर्णयप्रक्रिया हे एक तत्त्व म्हणून समाविष्ट केले गेले आहे.

(A) ग्राहक

(B) कर्मचारी

(C) तथ्य

(D) सेवा

48. 'जस्ट-इन-टाईम' या प्रतिमानामध्ये विक्रेत्याकडे ..... म्हणून पाहिले जाते.

(A) व्यवस्थापक

(B) कामगार

(C) भागीदार

(D) ग्राहक

49. ग्राहकांच्या अपेक्षांवर खरे उतरण्यासाठी गुणवत्ता नियंत्रणाचा एक भाग म्हणून कंपनी ..... अदा करते.

(A) प्रतिबंधासाठीची किंमत

(B) यादीची किंमत

(C) संधीची किंमत

(D) मूल्यमापनाची किंमत

50. National Assessment and Accreditation Council (NAAC) is an autonomous institution of .....

(A) ICSSR

(B) CISR

(C) AICTE

(D) UGC

51. The national flagship programme of education (SSA) aims at :

(A) Special education in primary schools

(B) Universalization of secondary education

(C) Integrated education in secondary education

(D) Universalization of elementary education

52. Large numbers of vlunerable and marginalized groups of learners were excluded from education systems worldwide was first acknowledged in ..... conference.

(A) Rio Summit, 2016

(B) Jomtien, Thailand, 1990

(C) Spain, 1994

(D) Stockholm, 1972

50. राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद (नॅक) ही ..... ची एक स्वायत्त संस्था आहे.

(A) आय.सी.एस.एस.आर.

(B) सी.आय.एस.आर.

(C) ए.आय.सी.टी.ई.

(D) यू.जी.सी.

51. राष्ट्रीय पातळीवरील शिक्षणाच्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचा (SSA) मुख्य हेतू आहे :

(A) प्राथमिक स्तरावर विशेष शिक्षण

(B) माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

(C) माध्यमिक स्तरावर एकात्मिक शिक्षण

(D) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

52. जगभरात फार मोठ्या प्रमाणावर गरजू आणि वंचित गटाला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आहे याबाबतची दखल सर्वप्रथम ..... परिषदेत घेतली.

(A) रियो समिट्, 2016

(B) जोमटीयन, थायलंड, 1990

(C) स्पेन, 1994

(D) स्टॉकहोम, 1972

53. Inclusion as a new strategy within the special education sector deals with .....

(A) Medical Model

(B) Political Model

(C) Social Model

(D) Economic Model

54. Barrier-free environment for people with disabilities means an environment .....

(A) That enables them to move freely anywhere

(B) That provides adequate facilities

(C) That has people around helping them

(D) That enables them to move about safely and use the facilities within the built environment

55. Which of the following bodies have jointly launched the project integrated education for disabled children ?

(A) NCERT and NCTE

(B) NCERT and UNICEF

(C) NCTE and UNICEF

(D) AICTE and UGC

53. विशेष शिक्षणात समावेशिकता ही नवीन नीतीशी ..... संबंधित आहे.

(A) वैद्यकीय प्रतिमान

(B) राजकीय प्रतिमान

(C) सामाजिक प्रतिमान

(D) आर्थिक प्रतिमान

54. अक्षमता असलेल्या व्यक्तींसाठी अडसर मुक्त वातावरण म्हणजे असे वातावरण की जे .....

(A) त्यांना कोठेही मुक्तपणे संचार करण्यासाठी सक्षम करणे

(B) त्यांना पुरेशा सुविधा पुरवेल

(C) त्यांच्याभोवती त्यांना मदत करणारे लोक असतील

(D) त्यांना मुक्त विहार करावयासाठी तयार वातावरणातील सुविधांचा वापर करण्यास सक्षम करणे

55. खालीलपैकी कोणत्या संस्थानी अकार्यक्षम बालकांकरिता एकात्मिक शिक्षण प्रकल्प सुरू केला ?

(A) एन.सी.ई.आर.टी. आणि एन.सी.टी.ई.

(B) एन.सी.ई.आर.टी. आणि यूनिसेफ

(C) एन.सी.टी.ई आणि युनिसेफ

(D) ए.आई.सी.टी.ई. आणि यू.जी.सी.

56. Which is the best educational enrichment program for gifted children ?

(A) Giving home assignments

(B) Providing extra guidance

(C) Providing extra counselling services

(D) Provision at extra curricular and co-curricular activities

57. Hyperactive behaviour means ..... behaviour.

(A) Easily distracted

(B) Irritable

(C) Irresponsible

(D) Cooperative

58. Reading readiness test does *not* measure .....

(A) Letter recognition

(B) Visual discrimination

(C) Verbal comprehension

(D) Number computation

56. प्रज्ञावंत बालकांकारिता सर्वात उत्तम शैक्षणिक समृद्धी कार्यक्रम कोणता आहे ?

(A) गृह कार्य देणे

(B) जादा मार्गदर्शन देणे

(C) जादा समुपदेशन सेवा पुरविणे

(D) अभ्यासपूरक आणि अभ्यासेतर कार्यक्रम

57. अतिचंचल वर्तन म्हणजे ..... असे वर्तन होय.

(A) सहज विचलित होणारा

(B) क्लेशदायक

(C) बेजबाबदार

(D) सहकार्यात्मक

58. वाचन सज्जता शोधिका ..... चे मापन करत नाही.

(A) मुळाक्षर ओळख

(B) दृक विभेदीकरण

(C) शाब्दिक आकलन

(D) अंक गणन

59. The method of using 'hand movements' for explaining verbal concepts to the hearing impaired students is called :

(A) Action method

(B) Demonstration method

(C) Cued speech method

(D) Finger spelling

60. Kalsonik propagated ..... curriculum plan for gifted students.

(A) Higher level and lower level

(B) Horizontal level and Tortical level

(C) Tortical level and lower level

(D) Horizontal level and vertical level

61. 'A Vindication of the Right of Men'– this book is written by .....

(A) Mahatma Gandhi

(B) Wollstonecraft

(C) J. Krishnamurthi

(D) Paulo Freire

59. श्रवणदोष विद्यार्थ्यांच्या शाब्दिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी हाताच्या हालचालीचा वापर करण्याच्या पद्धतीला ..... असे म्हणतात.

(A) कृती पद्धत

(B) दिग्दर्शन पद्धत

(C) क्युड स्पीच पद्धत

(D) करपल्लवी

60. काल्सनिक यांनी प्रज्ञावान विद्यार्थ्यांकरिता ..... ही पाठ्यक्रम योजना मांडली.

(A) उच्चस्तर आणि निम्नस्तर

(B) क्षितिजस्तर आणि तिर्यकस्तर

(C) तिर्यकस्तर आणि निम्नस्तर

(D) क्षितिजस्तर आणि उर्ध्वस्तर

61. 'ए विंडीकेशन ऑफ द राईट ऑफ मेन' हे पुस्तक ..... यांनी लिहिले.

(A) महात्मा गांधी

(B) वॉलस्टोनक्राफ्ट

(C) जे. कृष्णमुर्ती

(D) पावलो फ्रिअरी

62. The word Buddha means :

(A) Counsellor

(B) Enlightened

(C) Conqueror

(D) Motivator

63. The ..... of formation of social movement can also be called as 'The Unrest Stage'.

(A) Preliminary stage

(B) Popular stage

(C) Formalisation stage

(D) Stage of Institutionalisation

64. ..... is known as founder of Sociology.

(A) Karl Marx

(B) Herbert Spencer

(C) Auguste Comte

(D) Charles Darwin

65. In Islam, Ulum Naqliyya deals with .....

(A) Curriculum for educational institution

(B) Means for earning livelihood

(C) Interpretation of holy Qur'an

(D) Daily (Prayer) Namaz

62. 'बुद्ध' या शब्दाचा अर्थ :

(A) समुपदेशक

(B) स्वयंप्रकाशित

(C) विजेता

(D) प्रेरक

63. सामाजिक चळवळीतील ..... यांस 'अशांततेचा टप्पा' असेही म्हटले जाते.

(A) प्राथमिक टप्पा

(B) लोकप्रिय टप्पा

(C) घडणात्मक टप्पा

(D) संस्थात्मकरण टप्पा

64. ..... यांना समाजशास्त्राचा जनक म्हणून ओळखले जाते.

(A) कॉर्ल मार्क्स

(B) हर्बर्ट स्पेन्सर

(C) ऑगस्ट काम्टे

(D) चार्लस् डार्विन

65. इस्लाममध्ये उलुम नकलिया या बाबीशी संबंधित आहे .....

(A) शैक्षणिक संस्थेसाठी अभ्यासक्रम

(B) उपजीविकेची साधने

(C) पवित्र कुरानचा अन्वयार्थ

(D) दैनंदिन (प्रार्थना) नमाज

66. 'No knowledge comes from outside, it resides in human mind' this view about knowledge was expressed by .....

(A) Sri Aurobindo

(B) Swami Dayananda

(C) Swami Vivekananda

(D) Rabindranath Tagore

67. Which of the following books of Plato consists of his educational thoughts ?

(A) Gorgias and Phaedo

(B) Sophist and Lycis

(C) Laws and Republic

(D) Permenidus and Protagoras

68. Abhidhammapitak in Buddhism provides exposition of .....

(A) Social theories

(B) Philosophical theories

(C) Religious theories

(D) Humanistic theories

66. 'कोणतेही ज्ञान बाहेरून येत नाही, ते मनुष्याच्या मनातच वसते' ज्ञानाबद्दलचे हे मत कोणी मांडले ?

(A) श्री अरविंदो

(B) स्वामी दयानंद

(C) स्वामी विवेकानंद

(D) रविन्द्रनाथ टागोर

67. प्लेटोच्या पुढीलपैकी कोणत्या पुस्तकांमध्ये त्यांचे शैक्षणिक विचार समाविष्ट आहेत ?

(A) गॉर्जिएस आणि फिडो (Gorgias and Phaedo)

(B) सोफिस्ट आणि लायसिस (Sophist and Lycis)

(C) लॉज आणि रिपब्लिक (Laws and Republic)

(D) परमेंडस आणि प्रोटेगोरस (Permenidus and Protagoras)

68. बौद्ध धर्मातील अभिधम्मपिटक ..... दर्शवितात.

(A) सामाजिक सिद्धान्त

(B) तात्विक सिद्धान्त

(C) आध्यात्मिक सिद्धान्त

(D) मानवीय सिद्धान्त

69. According to ..... "Individuality is of no value and personality a meaningless term apart from social environment in which they are developed and made manifest".

(A) Auguste Comte

(B) Ross

(C) Ottaway

(D) Clarke

70. Science has no place in .....

(A) Modern education

(B) Idealistic education

(C) Existentialism

(D) Humanism

71. The recommendation to establish integrated training colleges was given by .....

(A) National Curriculum Framework (2005)

(B) National Policy of Education (1986-1992)

(C) Kothari Education Commission (1964-66)

(D) Yashpal Committee Report (2009)

69. ..... च्या मते ''ज्या सामाजिक वातावरणात व्यक्ती विकसित होते आणि प्रकट होते त्याच्या संदर्भाशिवाय व्यक्तित्त्वाला काहीच मूल्य नसून, व्यक्तिमत्त्व ही अर्थहीन संकल्पना आहे.

(A) ऑगस्ट कॉम्टे

(B) रॉस

(C) ऑटवे

(D) क्लार्क

70. विज्ञानास ..... कोणतेही स्थान नाही.

(A) आधुनिक शिक्षणात

(B) आदर्शवादी शिक्षणात

(C) अस्तित्ववादात

(D) मानवतावादात

71. एकात्मिक प्रशिक्षण महाविद्यालयांची स्थापना झाली पाहिजे अशी शिफारस ..... यांनी केली आहे.

(A) नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क (2005)

(B) नॅशनल पॉलिसी ऑफ एज्युकेशन (1986-1992)

(C) कोठारी एज्युकेशन कमिशन (1964-66)

(D) यशपाल कमिटी रिपोर्ट (2009)

72. Cost-benefit analysis in education focuses on .....

(A) Social benefits of education

(B) Individual benefits of education

(C) Economic benefits of education

(D) Family benefits of education

73. Quality of pre-service teacher education was emphasised by .....

(A) National Knowledge Commission (2007)

(B) National Policy of Education (1986-1992)

(C) Yashpal Committee Report (2009)

(D) Justice Verma Committee Report (2012)

74. The system of different schools for higher and lower classes of society was in practice in .....

(A) Aristocracy

(B) Communism

(C) Democracy

(D) Dictatorship

75. The provision of education of the Handicapped like integrated education for disabled children was made in .....

(A) National Commission on Teachers (1999)

(B) National Policy of Education (1992)

(C) Yashpal Committee Report (2009)

(D) Kothari Education Commission (1964-66)

72. शिक्षणातील व्यय-लाभ विश्लेषण ..... लक्ष केंद्रित करते.

(A) शिक्षणाच्या सामाजिक लाभांवर

(B) शिक्षणाच्या व्यक्तिगत लाभांवर

(C) शिक्षणाच्या आर्थिक लाभांवर

(D) शिक्षणाच्या कौटुंबिक लाभांवर

73. सेवापूर्व शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेवर ..... मध्ये जास्त भर दिला आहे.

(A) नॅशनल नॉलेज कमिशन (2007)

(B) नॅशनल पॉलिसी ऑफ एज्युकेशन (1986-1992)

(C) यशपाल कमिटी रिपोर्ट (2009)

(D) जस्टिस वर्मा कमिटी रिपोर्ट (2012)

74. समाजातील उच्च आणि निम्न वर्गीयांसाठी वेगवेगळ्या शाळा अशी पद्धती ..... मध्ये प्रचलित होती.

(A) महाजनसत्ता (Aristocracy)

(B) साम्यवाद (Communism)

(C) लोकशाही (Democracy)

(D) हुकूमशाही (Dictatorship)

75. दिव्यांग आणि अकार्यक्षम मुलांसाठी एकात्मिक शिक्षणाची सुविधा ..... ने सुचविली आहे.

(A) नॅशनल कमिशन ऑन टीचर्स (1999)

(B) नॅशनल पॉलिसी ऑफ एज्युकेशन (1992)

(C) यशपाल कमिटीचा रिपोर्ट (2009)

(D) कोठारी एज्युकेशन कमिशन (1964-66)

76. Giving grant-in-aid to affiliated private schools was recommended by .....

(A) Sir Charles Wood

(B) Lord Macaulay

(C) William Adam

(D) Lord Munro

77. In....., decisions taken by the ruler are to be propagated and to be imposed on students by teacher.

(A) Autocracy

(B) Aristocracy

(C) Monarchy

(D) Dictatorship

78. Subsequent policy cycles regarding education are quite necessary because .....

(A) it is the convention of democratic system

(B) it is the demand of common public

(C) it is the need of changing times

(D) it is the provision of constitution

76. संलग्नित खाजगी शाळांना अनुदान देण्याची शिफारस ..... यांनी केली.

(A) सर चार्लस् वुड

(B) लॉर्ड मेकॉले

(C) विलयम ॲडम

(D) लॉर्ड मॅन्रो

77. ..... प्रकारच्या राज्यपद्धतीमध्ये राज्यकर्त्याने घेतलेल्या निर्णयांचा शिक्षकांनी प्रसार करावयाचा असतो तसेच ते निर्णय विद्यार्थ्यांवर बिंबवायचे असतात.

(A) एकसत्ताक राज्यव्यवस्था

(B) महाजन सत्ता

(C) राजेशाही

(D) हुकूमशाही

78. शिक्षणासंदर्भात वेळोवेळी बदलती धोरणे आखावी लागतात कारण ..... .

(A) लोकशाही व्यवस्थेतील ती प्रथा आहे

(B) सर्वसामान्य जनतेची तशी मागणी असते

(C) ती बदलत्या काळाची गरज असते

(D) ती घटनेतील तरतूद आहे

79. ..... Commission is also known as 'Secondary Education Commission'.
(A) Yashpal
(B) Kothari
(C) Mudaliyar
(D) Radhakrishnan

80. Implementation of educational policy is execution of .....
(A) Educational policy into planning
(B) Educational policy into propagation
(C) Educational policy into action
(D) Educational policy into arrangement

81. Proper sequence of stages in creative thinking are as follows :
(A) (*i*) Verification
(*ii*) Incubation
(*iii*) Preparation
(*iv*) Illumination
(B) (*i*) Preparation
(*ii*) Incubation
(*iii*) Illumination
(*iv*) Verification
(C) (*i*) Incubation
(*ii*) Preparation
(*iii*) Illumination
(*iv*) Verification
(D) (*i*) Preparation
(*ii*) Incubation
(*iii*) Verification
(*iv*) Illumination

79. ..... आयोग 'माध्यमिक शिक्षण आयोग' या नावानेही ओळखला जातो.
(A) यशपाल
(B) कोठारी
(C) मुदलियार
(D) राधाकृष्णन

80. शैक्षणिक धोरणाचे कार्यान्वयन म्हणजे ..... होय.
(A) शैक्षणिक धोरणाचे नियोजन करणे
(B) शैक्षणिक धोरणाचा प्रसार करणे
(C) शैक्षणिक धोरणाचे कृतीत रूपांतर करणे
(D) शैक्षणिक धोरणाची मांडणी करणे

81. सर्जनशील विचारप्रक्रियेमध्ये विविध अवस्थांचा योग्य क्रम ..... हा होय.
(A) (*i*) पडताळा
(*ii*) उबविणे
(*iii*) पूर्वतयारी
(*iv*) प्रकाशन
(B) (*i*) पूर्वतयारी
(*ii*) उबविणे
(*iii*) प्रकाशन
(*iv*) पडताळा
(C) (*i*) उबविणे
(*ii*) पूर्वतयारी
(*iii*) प्रकाशन
(*iv*) पडताळा
(D) (*i*) पूर्वतयारी
(*ii*) उबविणे
(*iii*) पडताळा
(*iv*) प्रकाशन

82. Anushka's father and mother are above average intelligent but Anushka has average intelligence. This is the example of heredities' .....

(A) Law of average

(B) Law of like begets like

(C) Law of variation

(D) Law of regression

83. In operant conditioning subject's behaviour is ..... type of behaviour.

(A) Elicited

(B) Emitted

(C) Reflex

(D) Controlled

84. Aditi has I.Q. 124, then how will you label her by using Stanford-Binnet's classification table ?

(A) Genius

(B) Above medinary

(C) Very superior

(D) Superior

82. अनुष्काचे वडील व आई खूप बुद्धिमान आहेत; मात्र अनुष्का सामान्य बुद्धिमत्तेची आहे. हे उदाहरण अनुवंशाच्या ..... आहे.

(A) सरासरीचा नियम

(B) समानतेचा नियम

(C) गुणधर्म बदलाचा नियम

(D) परागामित्त्वाचा नियम

83. साधक अभिसंधानामध्ये प्रयोज्याचे वर्तन हे ..... प्रकारचे वर्तन असते.

(A) उत्क्षेपित

(B) स्वयंस्फूर्त

(C) प्रतिक्षिप्त

(D) नियंत्रित

84. आदितीचा बुद्धिगुणांक 124 आहे, तर स्टॅनफोर्ड-बीनेचे वर्गीकरण सारणीनुसार तिचे नामांकन तुम्ही कसे कराल ?

(A) अलौकिक

(B) असामान्य

(C) कुशाग्र

(D) शीघ्र

85. Which of the following tests is useful to detect the maladjustment ?

(A) The Bell Adjustment inventory

(B) Allport's test

(C) Colman's test

(D) Shaffer and Shoben's test

86. Idea of social intelligence putforth by ..... .

(A) Gardner

(B) Goleman

(C) Thorndike

(D) Sheldon

87. Emotional instability, hyperactiveness, emotional explosion are the impact of excessive secretion of hormones from .....

(A) Pituitary glands

(B) Adrenal glands

(C) Thyroid glands

(D) Gonads

85. विषमायोजन शोधण्यासाठी खालीलपैकी कोणती कसोटी उपयुक्त ठरते ?

(A) बेलची समायोजन शोधिका

(B) अल्पोर्टची चाचणी

(C) कोलमनची चाचणी

(D) शेफर व शोबेनची चाचणी

86. सामाजिक बुद्धिमत्तेची कल्पना ..... यांनी मांडली.

(A) गार्डनर

(B) गोलमन

(C) थार्नडाईक

(D) शेल्डन

87. भावनिक अस्थिरता, अतिचंचलता, भावनिक उद्रेक हे ..... या ग्रंथीतून अतिरिक्त स्रावणाऱ्या हार्मोन्सचा परिणाम होय.

(A) मस्तिष्क ग्रंथी

(B) वृक्कस्थ ग्रंथी

(C) कंठस्थ ग्रंथी

(D) जननग्रंथी

88. Which of the following is not the goal of counselling ?

(A) To help the counsellee become self-actualizing

(B) To help the counsellee attain self-realization

(C) To help the counsellee attain self-control

(D) To help the counsellee become a fully functioning person

89. 'Guidance is a process by which an individual is able to guide himself.' This definition of guidance is given by .....

(A) Ruth Strang

(B) Good

(C) Brewer J.M.

(D) Jones

88. खालीलपैकी समुपदेशनाचे कोणते ध्येय **नाही** ?

(A) समुपदेशनार्थीला आत्मप्रत्यक्षीकरणासाठी साह्य करणे

(B) समुपदेशनार्थीला आत्मप्रचितीसाठी साह्य करणे

(C) समुपदेशनार्थीला आत्मनियंत्रणासाठी साह्य करणे

(D) समुपदेशनार्थीला कार्यक्षम बनण्यासाठी साह्य करणे

89. 'स्वत:चे मार्गदर्शन स्वत:च करण्यासाठी व्यक्तीस समर्थ करणारी प्रक्रिया म्हणजेच मार्गदर्शन होय' ही मार्गदर्शनाची व्याख्या ..... यांनी केलेली आहे.

(A) रूथ स्ट्रँग

(B) गुड

(C) ब्रेवर जे. एम.

(D) जोन्स

90. William Procter told the following types of guidance :

(A) (*i*) Educational

(*ii*) Vocational

(*iii*) Character development

(*iv*) Content and physical activity

(B) (*i*) Vocational

(*ii*) Personal

(*iii*) Economical

(*iv*) Religious

(C) (*i*) Character development

(*ii*) Economical

(*iii*) Educational

(*iv*) Personal

(D) (*i*) Content and physical activity

(*ii*) Personal

(*iii*) Economical

(*iv*) Social

91. Experiential learning focuses on the learning process for the .....

(A) Individual

(B) Small group

(C) Large group

(D) Peer group

90. विल्यम प्रॉक्टरने मार्गदर्शनाचे खालील प्रकार सांगितले आहेत :

(A) (*i*) शैक्षणिक

(*ii*) व्यावसायिक

(*iii*) चारित्र्य विकसन

(*iv*) आशय व शारीरिक कृती

(B) (*i*) व्यावसायिक

(*ii*) व्यक्तिगत

(*iii*) आर्थिक

(*iv*) धार्मिक

(C) (*i*) चारित्र्य विकसन

(*ii*) आर्थिक

(*iii*) शैक्षणिक

(*iv*) व्यक्तिगत

(D) (*i*) आशय व शारीरिक कृती

(*ii*) व्यक्तिगत

(*iii*) आर्थिक

(*iv*) सामाजिक

91. अनुभवजन्य शिक्षण ..... अध्ययन-प्रक्रियेवर भर देते.

(A) व्यक्तिगत

(B) लहान गटाच्या

(C) मोठ्या गटाच्या

(D) सहाध्यायी गटाच्या

92. CGPA stands for .....

(A) Collective Grade Point Average

(B) Cumulative Grade Point Average

(C) Collaborative Group Point Average

(D) Cumulative Group Point Average

93. A teacher has professional knowledge and skills gained through ..... preparation and experience.

(A) Formal

(B) Non-formal

(C) Informal

(D) Incidental

94. According to Kothari Commission's recommendations (1964-66), the main function of SBTE is .....

(A) Development of Teacher Education

(B) Development of Higher Education

(C) Development of Primary Education

(D) Development of Pre-Primary Education

92. सीजीपीए चे प्रारूप ..... हे आहे.

(A) कलेक्टिव्ह ग्रेड पॉईंट ॲव्हरेज

(B) क्युम्युलेटिव्ह ग्रेड पॉईंट ॲव्हरेज

(C) कॉलेबॉरेटिव्ह ग्रुप पॉईंट अव्हरेज

(D) क्युम्युलेटिव्ह ग्रुप पॉईंट ॲव्हरेज

93. शिक्षक व्यावसायिक ज्ञान आणि कौशल्ये ..... तयारी आणि अनुभव यामधून प्राप्त करतो.

(A) औपचारिक

(B) अनौपचारिक

(C) सहज

(D) प्रासंगिक

94. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार (1964-66) SBTE चे मुख्य कार्य ..... हे आहे.

(A) शिक्षक शिक्षणाचा विकास

(B) उच्च शिक्षणाचा विकास

(C) प्राथमिक शिक्षणाचा विकास

(D) पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा विकास

95. RMSA is a Central Government sponsored scheme of .....

(A) SCERT

(B) MHRD

(C) RUSA

(D) NCERT

96. In India UGC was established in .....

(A) 1956

(B) 1961

(C) 1986

(D) 1995

97. When educators thoughtfully experiment and apply new or different pedagogies, technologies, course design and assessments to enhance the quality of the education; it is called ..... .

(A) Learner-centred education

(B) Teacher-centred education

(C) Technology-centred education

(D) Innovation in Teaching and Learning

95. RMSA ही केंद्र सरकारने पुरस्कृत केलेली ..... ची योजना आहे.

(A) एस.सी.ई.आर.टी.

(B) एम.एच.आर.डी.

(C) रूसा

(D) एन.सी.ई.आर.टी.

96. भारतामध्ये यू.जी.सी.ची स्थापना ..... मध्ये करण्यात आली.

(A) 1956

(B) 1961

(C) 1986

(D) 1995

97. जेंव्हा शिक्षक प्रशिक्षक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी विचारपूर्वक प्रयोग करतो आणि नवीन किंवा वेगळ्या अध्यापनशास्त्रीय पद्धती, तंत्रविज्ञान, अभ्यासक्रम आराखडे आणि मूल्यांकने याचा वापर करतो त्यास ..... असे म्हणतात.

(A) विद्यार्थीकेंद्री शिक्षण

(B) शिक्षककेंद्री शिक्षण

(C) तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षण

(D) अध्ययन व अध्यापनातील नवोपक्रम

98. When two or more people learn or attempt to learn something together is ..... .

(A) Insightful learning

(B) Thoughtful learning

(C) Experimental learning

(D) Collaborative learning

99. The attitude towards work i.e. the dedication, sincerity with which you approach to your work, which makes you earn money is called .....

(A) Performance

(B) Expertise

(C) Professionalism

(D) Resourcefulness

100. According to Schulman, teacher education programs should combine the following two knowledge fields :

(A) Pedagogical knowledge and Content knowledge

(B) Skill knowledge and Pedagogical knowledge

(C) Content knowledge and Historical knowledge

(D) Philosophical knowledge and Methodological knowledge

98. जेंव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रितपणे काहीतरी शिकतात किंवा शिकण्याचा प्रयत्न करतात, त्यास ..... असे म्हणतात.

(A) मर्मदृष्टीमूलक अध्ययन

(B) वैचारिक अध्ययन

(C) प्रायोगिक अध्ययन

(D) सहयोगात्मक अध्ययन (Collaborative learning)

99. कार्याप्रतीची अभिवृत्ती अर्थात समर्पणभाव ज्या प्रामाणिकतेने तुम्ही तुमच्या कार्याकडे पाहता, ज्या कार्यातून तुम्ही अर्थार्जन करता, ती म्हणजे ..... होय.

(A) कार्यमान

(B) तज्ज्ञता

(C) व्यावसायिकता

(D) साधनसज्जता

100. शुलमनच्या मते शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात पुढील दोन प्रकारच्या ज्ञानक्षेत्रांचा समावेश असावा :

(A) अध्यापनशास्त्रीय ज्ञान आणि आशयज्ञान

(B) कौशल्यज्ञान आणि अध्यापनशास्त्रीय ज्ञान

(C) आशयज्ञान आणि ऐतिहासिक ज्ञान

(D) तात्त्विक ज्ञान आणि कार्यपद्धती ज्ञान

ROUGH WORK